शुक्रवार दि. ०२ ऑक्टोबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ३१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेतून जालना जिल्ह्यात १३७ कर्ज प्रस्तावांना मंजुरी

### १३०० प्रकरणांचे उद्दिष्ट; तरुणांनी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

**जालना -प्रतिनिधी**

शहरी व ग्रामीण भागातील सुशिक्षित युवक-युवतींना उद्योग, व्यवसाय व स्वयंरोजगाराच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाची मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम () योजना राबविण्यात येत आहे. या योजनेला जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत असून, सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी आतापर्यंत १३७ कर्ज प्रस्तावांना बँकांकडून मंजुरी देण्यात आली आहे. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी जालना जिल्ह्यासाठी ७८० कर्ज मंजुरी प्रस्ताव देण्यात आले होते. त्यापैकी जिल्हा उद्योग केंद्रामार्फत ५६९ कर्ज प्रस्ताव बँकांकडे शिफारस करण्यात आले असून, त्यातील १११ कर्ज प्रस्तावांना बँकांनी मंजुरी दिली आहे. तसेच जिल्हा खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत २४७ कर्ज प्रस्ताव बँकांकडे शिफारस करण्यात आले असून, त्यापैकी २६ कर्ज प्रस्तावांना मंजुरी मिळाली आहे. अशा प्रकारे एकूण १३७ कर्ज प्रस्तावांना बँकांनी मंजुरी दिली आहे. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी १३०० प्रकरणांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी ग्रामीण व शहरी भागातील युवक-युवतींनी योजनेच्या संकेतस्थळ www.maha-cmegp.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने जास्तीत जास्त अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. योजनेच्या संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या कर्ज प्रस्तावांना बँकांनी त्वरित कर्ज मंजुरी देऊन उद्दिष्टपूर्तीसाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे उपआयुक्त यो.रा. सारणीकर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## जालना जिल्ह्यात मंडळनिहाय चारा छावण्या तात्काळ सुरु करा

### शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांची भेट घेऊन दिले निवेदन

**मुंबई - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जनावरांसाठी चारा व पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यातील आठही तालुक्यांमध्ये मंडळनिहाय चारा छावण्या तात्काळ सुरू करण्यात याव्यात, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी केली. याबाबत मुंबई येथील रामटेक बंगल्यावर जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी जालना जिल्ह्यातील पाणीटंचाई, चाऱ्याची कमतरता तसेच पशुपालकांसमोरील अडचणींबाबत पालकमंत्र्यांचे लक्ष वेधण्यात आले.



जालना, बदनापूर, भोकरदन, जाफराबाद, अंबड, घनसावंगी, परतूर व मंठा या आठही तालुक्यांमध्ये यंदा अपेक्षित प्रमाणात पाऊस न झाल्याने अनेक भागांत पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे. नदी-नाले, तलाव व जलसाठे पुरेशा प्रमाणात भरलेले नसल्याने जनावरांसाठी पिण्याचे पाणी तसेच चारा उपलब्ध करून देण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

निवेदनातील प्रमुख मागण्या

आठही तालुक्यांमध्ये मंडळनिहाय किमान एक चारा छावणी तात्काळ सुरू करावी.

चारा छावण्यांमध्ये जनावरांसाठी पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध करून द्यावा.

जनावरांसाठी स्वच्छ व पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे. चारा छावण्यांमध्ये जनावरांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. (पान २ वर)



आज गांधी जयंती निमित्त पूर्व संध्यस महानगरपालिकेच्या वतीने गांधी चमन येथे साफसफाई करताना कर्मचारी

(छाया- जावेद तांबोली )

## जिल्ह्यातील अपघातप्रवण क्षेत्रातील प्रलंबित सुरक्षा उपाययोजनांची कामे तातडीने पूर्ण करा - जिल्हाधिकारी मित्तल

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील अपघातप्रवण क्षेत्रांवरील (ब्लॅक स्पॉट) प्रलंबित सुरक्षा उपाययोजनांची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी संबंधित यंत्रणांना दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा रस्ते सुरक्षा समितीची आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. पोलीस अधिक्षक तेगबीर सिंह संधु, सार्वजनीक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर कोल्हे, सार्वजनीक बांधकाम विभाग कार्यकारी विभाग २ चे कार्यकारी अभियंता व्यं.ना. मिठ्ठेवाड, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी मनिष दौंड, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे वाहतुक निरिक्षक आ. अ. सोनवणे, विद्युत अभियंता के.बी. गावंडे, पोलीस निरिक्षक सुरेश उणवणे आदींची उपस्थिती होती. या बैठकीत जिल्ह्यातील ब्लॅक स्पॉट, रस्ते सुरक्षा उपाययोजना आणि प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. चिंचखेड फाटा, काजळा फाटा, सुखापुरी फाटा, चौधरी नगर, मंठा चौफुली आणि चंदनझिरा या सहा ब्लॅक स्पॉटवरील सुरक्षा उपाययोजनांची कामे पूर्ण झाल्याचे बैठकीत स्पष्ट झाले. या कामांबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. सेव्ह लाईफ फाउंडेशनने सुचविलेल्या १२५ क्रिटिकल ब्लॅक स्पॉटपैकी २३ प्राधान्य ब्लॅक स्पॉट तसेच जिल्ह्यातील इतर २६ ब्लॅक स्पॉटवर आवश्यक उपाययोजना करण्यात येणार आहेत. यापैकी एकही ब्लॅक स्पॉट उपाययोजनांशिवाय अपूर्ण (पान २ वर)

## प्रलंबित अपील प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी लोकअदालतीचे आयोजन

### ६ ऑक्टोबर रोजी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयात सुनावणी

**जालना - प्रतिनिधी**

जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, जालना यांच्या कार्यालयात मोठ्या प्रमाणावर एकत्रीकरण व नगर भूमापनासंबंधित अपील प्रकरणे प्रलंबित आहेत. या प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यालयाकडून निकाली काढण्यासाठी प्राप्त झालेल्या अपील प्रकरणांबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे. त्यासाठी दि. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, जालना यांच्या कार्यालयात लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. संबंधित प्रकरणांमध्ये अपीलदार, जबाबदार किंवा मिळकतीच्या संदर्भात कोणाचा काही हितसंबंध असल्यास त्यांनी स्वतः किंवा कायदेशीर प्रतिनिधीमार्फत लोकअदालतीस हजर राहावे. तसेच मिळकतीशी संबंधित कागदपत्रे व पुराव्यांसह (पान २ वर)

## लिहा येथे मटका अड्ड्यावर एसपी स्कॉडचा छापा; ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त

### रोख ३९,२२० रुपये व दोन मोबाईल हस्तगत; सुनील राजपूतविरुद्ध कारवाई

**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात अवैध मटका व जुगार व्यवसायाविरोधात पोलिसांकडून सुरू असलेल्या विशेष मोहिमेला वेग आला असून, एसपी स्क्वॉड, जालना यांनी पारध पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लिहा, ता. भोकरदन येथे मटका अड्ड्यावर धडक कारवाई केली. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीरसिंग संधू यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईत मटका जुगारासाठी वापरली जात असल्याचा आरोप असलेली रोख रक्कम आणि दोन मोबाईल असा एकूण ५५ हजार २२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पारध पोलीस ठाण्याच्या हद्दीत लिहा येथे अवैध मटका व्यवसाय सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर एसपी स्क्वॉडने कारवाई केली. पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकून तपासणी केली असता ३९ हजार २२० रुपयांची रोख रक्कम तसेच १६ हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल असा एकूण ५५ हजार २२० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला.

या कारवाईत सुनील हिरालाल राजपूत, रा. लिहा, ता. भोकरदन, जि. जालना याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार, सदर मटका व्यवसायाशी संबंधित असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. जप्त करण्यात आलेली रोख रक्कम व मोबाईल याबाबत पोलिसांकडून पुढील तपास करण्यात (पान २ वर)

## जिरडगाव खून प्रकरणाचा २४ तासांत उलगडा; दोन आरोपी अटकेत

**घनसावंगी - प्रतिनिधी**

घनसावंगी तालुक्यातील जिरडगाव येथे घडलेल्या खून प्रकरणाचा घनसावंगी पोलिसांनी अवघ्या २४ तासांत उलगडा केला असून, या प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

**न्यायालयाकडून तीन दिवसांची पोलीस कोठडी**

शेतजमिनीच्या वादातून मयत नामदेव अंजीराम पाईकराव यांचा त्यांचा भाऊ सुनील अंजीराम पाईकराव याने साथीदाराच्या मदतीने धारदार शस्त्राने वार करून खून केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणी घनसावंगी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. ५०९/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) अन्वये ३० सप्टेंबर २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन घनसावंगी पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. तपासासाठी दोन स्वतंत्र पथके तयार करून आरोपींचा शोध सुरू करण्यात आला.

गुन्हा दाखल होताच पोलिसांनी घटनाक्रमाची माहिती संकलित करण्यास सुरुवात केली. गोपनीय माहिती तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपासाची दिशा निश्चित करण्यात आली. या तपासादरम्यान पोलिसांना संशयित आरोपींबाबत महत्त्वाचे धागेदोरे मिळाले. त्यानुसार पोलिसांनी सुनील अंजीराम पाईकराव, रा. नाशिक आणि त्याचा कथित साथीदार सागर आनंदा चंद्रमोरे, रा. म्हसरूळ, नाशिक यांचा शोध घेतला. दोन्ही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर त्यांची चौकशी करण्यात आली. तपासादरम्यान शेतजमिनीच्या वादातून खून झाल्याचे समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलिसांच्या तपासानुसार, मयत नामदेव पाईकराव आणि आरोपी सुनील पाईकराव हे भाऊ असून, त्यांच्यात शेतजमिनीच्या कारणावरून वाद होता. या वादातून सुनील याने त्याच्या साथीदाराच्या मदतीने नामदेव यांच्यावर धारदार शस्त्राने वार केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. मात्र, या प्रकरणातील नेमका घटनाक्रम, खुनामागील कारणांची व्याप्ती आणि वापरण्यात आलेले शस्त्र याबाबत (पान २ वर)

## सीईओंच्या आवाहनाला मोठा प्रतिसाद

### ‘एक दिवस, एक तास, एक सोबत’ उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग

**जालना - प्रतिनिधी**

‘स्वच्छता ही सेवा २०२६’ अभियानांतर्गत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारिया यांनी केलेल्या आवाहनाला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ‘एक दिवस, एक तास, एक सोबत’ या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील गावागावात सामूहिक श्रमदानाचे आयोजन करण्यात आले. ग्रामस्थ, महिला बचत गट, युवक मंडळे, शासकीय कर्मचारी तसेच विविध विभागांच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभागी होत गाव परिसर स्वच्छ केला.



केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत ‘स्वच्छता ही सेवा’ अभियान राबविण्यात येत आहे. *‘स्वच्छतेमध्ये सहभाग, स्वच्छ भारत, विकसित भारत’* या संकल्पनेवर आधारित या अभियानाचा भाग म्हणून १ ऑक्टोबर रोजी जिल्ह्यात विशेष श्रमदान उपक्रम घेण्यात आला.

गटविकास अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतींनी गावनिहाय नियोजन करून विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविली. गावातील रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, शाळा परिसर, मंदिर, प्राथमिक आरोग्य केंद्र,अंगणवाडी परिसर तसेच इतर ठिकाणांवरील कचरा संकलित करून परिसर स्वच्छ करण्यात आला. या श्रमदानामध्ये गट विकास अधिकारी यांच्यासह तालुकास्तरीय विभागप्रमुख, ग्रामपंचायत अधिकारी, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या, युवक मंडळे, महिला बचत गट, एनसीसी, नेहरू युवा केंद्राचे सदस्य तसेच नागरिकांनी (पान २ वर)

## गांधी जयंतीनिमित्त जालन्यात गांधी विचारांचा जागर

### भजन, चरखा व सामूहिक घोषणांतून सत्य, अहिंसा, सर्वधर्मसमभाव आणि स्वावलंबनाचा संदेश

**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्हा सर्वोदय मंडळ आणि गांधी विचाराशी संलग्न विविध संघटनांच्या वतीने गांधी चमन येथे (ता.१) गुरुवारी सकाळी १०.३० वाजता राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त गांधी विचारांचा जागर करण्यात आला. भजन गायन, सामूहिक घोषणा, चरखा व सूतकताई तसेच प्रार्थना आणि प्रतिज्ञेच्या माध्यमातून सत्य, अहिंसा, सर्वधर्मसमभाव, बंधुता, स्वदेशी आणि स्वावलंबनाचा संदेश देण्यात आला. शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.



कार्यक्रमात ‘‘रघुपती राघव राजाराम’’, ‘‘खरा तो एकचि धर्म’’, ‘‘दे दी हमें आजादी बिना खड्ग बिना ढाल’’ तसेच ‘‘हीच आमची मागणी, हेच आमची प्रार्थना माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागणे’’ या भजनांचे सामूहिक गायन करण्यात आले. श्री. तुषार यांनी भजन गायन केले, तर रवि वाघमारे यांनी संगीताची साथ दिली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत भजन गायनात सहभाग घेतला. यावेळी विविध घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. या घोषणांमधून सामाजिक ऐक्य, सर्वधर्मसमभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यात आला.

**चरख्यातून स्वावलंबनाचा संदेश**

कार्यक्रमात चरखा व सूतकताईचे प्रात्यक्षिक दाखवून गांधीजींच्या स्वदेशी आणि स्वावलंबनाच्या विचारांचे महत्त्व विद्यार्थ्यांना व उपस्थित नागरिकांना (पान २ वर)

## जालन्यात उद्या वरिष्ठ राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धा..

**जालना - प्रतिनिधी**

जे ई एस महाविद्यालय येथे आयोजित महाराष्ट्र राज्य वरिष्ठ खुल्या धनुर्विद्या स्पर्धेचा उत्साह शिगेला पोहोचला आहे.या स्पर्धेत राज्यभरातील धनुर्विद्या खेळाडू सहभागी होणार असून,उद्या सकाळी ११ वाजता इंडियन राऊंड धनुष्य प्रकारातील स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे.इंडियन राऊंड हा भारतीय पारंपरिक धनुर्विद्या सोबत जोडलेला महत्त्वाचा प्रकार असून या माध्यमातून भारतीय धनुर्विद्येची परंपरा आणि आधुनिक स्पर्धात्मक




क्रीडा यांचा सुंदर संगम पाहायला मिळणार आहे.या स्पर्धेच्या आयोजनाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीस साई चे माजी प्रशिक्षक श्री.प्रवीण शर्मा,जिल्हा धनुर्विद्या भीष्म असोसिएशनचे अध्यक्ष श्री.महेश सारस्वत,सचिव श्री.प्रकाश दुसेजा,स्पर्धा समितीचे संयोजक डॉ.हेमंत वर्मा,डॉ.किशोर बिरकायलू ,राहुल सारस्वत,प्रा.राजेंद्र सोनवणे उपस्थित होते.जालना येथे होत असलेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेमुळे जिल्ह्यातील (पान २ वर)

# संपादकीय...

## सातबारा आणि डिजिटल नकाशात कोण खरे?

शेतकऱ्याच्या हातात सातबारा असतो, शेत त्याच्या डोळ्यांसमोर असते आणि वर्षभराची मेहनत त्या शेतात उभी असते. मात्र, सरकारी यंत्रणेच्या डिजिटल नकाशाला त्याच शेताचे अस्तित्व मान्य नसेल, तर प्रश्न केवळ तांत्रिक बिघाडाचा राहत नाही; तो प्रशासनाच्या अभिलेख व्यवस्थेतील गंभीर विसंगतीचा बनतो. सावरगाव हडप आणि नवनिर्मित रामनगरमधील शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेली 'आऊट ऑफ बाउंड्री' आणि 'इनव्हॅलिड पॉलीगॉन'ची समस्या याच व्यवस्थात्मक गोंधळाचे उदाहरण आहे. प्रत्यक्ष शेतात उभे राहूनही मोबाईल ॲप शेतकरी शेताच्या हद्दीबाहेर असल्याचे दाखवत असेल, तर दोष शेतकऱ्याचा नाही. मग त्याची पीक नोंदणी रखडली तर त्याची जबाबदारी कोणाची? महसूल विभागाने कागदावरील अभिलेखांचे डिजिटल रूपांतर केले, ई-पीक पाहणीसारख्या प्रणाली आणल्या आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रशासन अधिक पारदर्शक व गतिमान करण्याचा प्रयत्न केला. उद्देश निश्चितच चांगला आहे. परंतु डिजिटल नकाशा आणि प्रत्यक्ष महसूल अभिलेख यांच्यातच ताळमेळ नसेल, तर तंत्रज्ञान सुविधा न राहता अडथळा ठरते. सावरगाव हडपमधून रामनगरची निर्मिती झाल्यानंतर नवीन गट क्रमांक, गाव नकाशे, सातबारा आणि डिजिटल भू-अभिलेख यांचा परस्पर ताळमेळ वेळेत झाला नसेल, तर ही जबाबदारी शेतकऱ्यावर टाकता येणार नाही. प्रश्न साधा आहे ज्या अभिलेखांमध्ये शासनाने बदल केले, त्या बदलांची अंमलबजावणी शासनाच्या सर्व प्रणालींमध्ये करण्याची जबाबदारीही शासनाचीच असायला नको का? ई-पीक पाहणी ही केवळ मोबाईलवर फोटो काढण्याची प्रक्रिया नाही. पिकांची अधिकृत नोंद, महसूल अभिलेख आणि विविध कृषीविषयक प्रक्रियांशी तिचा संबंध आहे. त्यामुळे तांत्रिक अडथळ्यामुळे पीक नोंदणी झाली नाही, तर भविष्यात शेतकऱ्याला अडचणी निर्माण होऊ शकतात. विशेषतः नैसर्गिक आपत्ती, पीक नुकसान, विमा किंवा इतर शासकीय मदतीच्या प्रक्रियेत पिकाची नोंद महत्त्वाची ठरू शकते. अशा परिस्थितीत ॲपने नोंद स्वीकारली नाही म्हणून शेतकऱ्याचे नुकसान होणे ही न्याय्य व्यवस्था ठरू शकत नाही. प्रशासनाने म्हणूनच एक मूलभूत तत्त्व स्वीकारले पाहिजे तांत्रिक त्रुटीचा परिणाम नागरिकावर होता कामा नये. आज परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की एका बाजूला शेतकऱ्याच्या हातातील सातबारा एक गट क्रमांक सांगतो, तर डिजिटल भू-नकाशा दुसरा गट क्रमांक दाखवतो. प्रत्यक्ष शेताची हद्द वेगळी आणि प्रणालीतील हद्द वेगळी असेल तर सामान्य शेतकरी नेमके कोणते अभिलेख खरे मानणार? हा प्रश्न सावरगाव हडप आणि रामनगरपुरता मर्यादित नाही. राज्यात गाव विभाजन, गट पुनर्रचना, हद्द बदल आणि डिजिटल भू-अभिलेखांच्या प्रक्रियेत अशा तफावती अन्यत्रही निर्माण होऊ शकतात. त्यामुळे या घटनेकडे एक स्थानिक तांत्रिक तक्रार म्हणून नव्हे, तर महसूल अभिलेखांच्या डिजिटल संक्रमणातील इशारा म्हणून पाहण्याची गरज आहे. या प्रश्नावर केवळ ''तांत्रिक अडचण आहे, लवकरच दूर होईल'' एवढे सांगून चालणार नाही. तहसीलदार, भूमी अभिलेख विभाग, तलाठी यंत्रणा आणि संबंधित डिजिटल प्रणालीचे तज्ज्ञ यांनी संयुक्तपणे प्रत्यक्ष पाहणी करून गाव नकाशा, सातबारा, फेरफार अभिलेख आणि डिजिटल भू-नकाशा यांचा ताळमेळ तपासला पाहिजे. ज्या गट क्रमांकांमध्ये विसंगती आहे, त्यांची यादी तयार करून दुरुस्तीची स्पष्ट प्रक्रिया आणि कालमर्यादा निश्चित केली पाहिजे. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, दुरुस्ती पूर्ण होईपर्यंत शेतकऱ्यांची ई-पीक पाहणी अडू नये यासाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध केली पाहिजे. तांत्रिक अडचणीमुळे नोंदणी होऊ न शकलेल्या शेतकऱ्यांसाठी विशेष ऑफलाइन/प्रशासकीय पडताळणीची सुविधा उपलब्ध करून देणे हा व्यवहार्य मार्ग ठरू शकतो. डिजिटल महाराष्ट्राची चर्चा करताना ॲप, पोर्टल आणि ऑनलाइन सेवा यांची संख्या मोजणे पुरेसे नाही. त्या प्रणालीमुळे शेवटच्या घटकालाम्हणजे शेतकऱ्यालाकिती सुविधा मिळाली, ही खरी कसोटी आहे. शेतकरी तंत्रज्ञानविरोधी नाही. उलट, तो शासनाच्या डिजिटल व्यवस्थेचा स्वीकार करतो आहे. परंतु त्याच्याकडून डिजिटल प्रक्रियेचे पालन अपेक्षित असेल, तर शासनानेही आपल्या अभिलेखांमध्ये अचूकता सुनिश्चित केली पाहिजे. शेतकरी शेतात उभा आहे, पीक त्याच्यासमोर आहे, सातबारा त्याच्या हातात आहे; तरीही सरकारी ॲप म्हणत असेल की 'तुम्ही तुमच्या शेताच्या हद्दीत नाही', तर चूक शेतकऱ्याची नसून व्यवस्थेने स्वतःकडे पाहण्याची वेळ आलेली आहे. सातबारा आणि डिजिटल नकाशातील अंतर प्रशासनाने भरायचे आहे; त्याची किंमत शेतकऱ्याच्या पिकाने किंवा भविष्यातील हक्कांनी चुकवता कामा नये.

## शासनाने धनुर्विद्येसाठी केली भरघोस तरतूद – प्रमोद चांदूरकर

**जालना - प्रतिनिधी**

धनुर्विद्या या पारंपरिक तसेच आधुनिक क्रीडा प्रकाराच्या विकासासाठी शासनाने यंदा भरघोस आर्थिक तरतूद केली असून, राज्यातील खेळाडू, प्रशिक्षक आणि धनुर्विद्या केंद्रांना याचा मोठा लाभ होणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य धनुर्विद्या संघटनेचे सचिव प्रमोद चांदूरकर यांनी दिली. धनुर्विद्येला अधिक व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात विविध स्तरांवर स्पर्धा, प्रशिक्षण शिबिरे आणि क्रीडा सुविधा विकसित करण्यावर भर दिला जात आहे. ग्रामीण व शहरी भागातील गुणवंत खेळाडूंना प्रोत्साहन देऊन त्यांना राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी उपलब्ध करून देण्याचे काम संघटनेच्या माध्यमातून सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, जालना येथे आयोजित महाराष्ट्र राज्य वरिष्ठ खुल्या धनुर्विद्या स्पर्धेचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. या स्पर्धेत राज्यभरातील धनुर्विद्या खेळाडू सहभागी होणार असून, उद्या सकाळी ११ वाजता इंडियन राऊंड धनुष्य प्रकारातील स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. इंडियन राऊंड हा भारतीय पारंपरिक धनुर्विद्येशी जोडलेला महत्त्वाचा प्रकार असून, या माध्यमातून भारतीय धनुर्विद्येची परंपरा आणि आधुनिक स्पर्धात्मक क्रीडा यांचा सुंदर संगम पाहायला मिळणार आहे. या स्पर्धेच्या आयोजनाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीस साईचे माजी प्रशिक्षक प्रवीण शर्मा, जिल्हा धनुर्विद्या भीष्म असोसिएशनचे अध्यक्ष महेश सारस्वत, सचिव प्रकाश दुसेजा, स्पर्धा समितीचे संयोजक डॉ. हेमंत वर्मा तसेच राहुल सारस्वत उपस्थित होते.

# भारत मातेचे थोर सुपुत्र; लाल बहादूर शास्त्री

भारत मातेचे थोर सुपुत्र, देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची आज जयंती आहे. लालबहादूर शास्त्री यांचे पूर्ण नाव लालबहादूर शारदाप्रसाद वर्मा असे होते. पण १९२५ साली बनारस येथील काशी विद्यापीठाची शास्त्री ही पदवी लालबहादूर यांनी मिळवली त्यामुळे त्यांना सर्वजण शास्त्री म्हणू लागले पुढे त्यांनी आपल्या नावापुढे शास्त्री हेच नाव लावले आणि ते लालबहादूर वर्माचे लालबहादूर शास्त्री बनले. त्यांचा जन्म २ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मोगल सराई या गावात झाला. लालबहादूर शास्त्री दीड वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या आईनेच त्यांचा सांभाळ केला. लालबहादूर शास्त्री यांचे बालपण गरिबीतच गेले. घरची हलाखीची परिस्थिती असूनही लालबहादूर यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शालेय वयातच लाला लजपतरायांनी स्थापन केलेल्या द सर्व्हन्ट ऑफ द पीपल सोसायटीचे सदस्यत्व त्यांनी घेतले. महात्मा गांधींच्या विचाराने ते प्रभावित झाले होते. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला. गांधीजींसोबत दांडी यात्रेतही त्यांनी भाग घेतला होता. १९३९ साली त्यांची पंडित नेहरूंशी भेट झाली आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. देश स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरुंच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वे व वाहतूक, दळणवळण, वाणिज्य व उद्योग आणि गृहमंत्रीपद भूषविले. ते रेल्वेमंत्री असताना एकदा रेल्वेचा अपघात झाला होता त्यात काही प्रवाशांना स्वतःचा जीव गमवावा लागला होता या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारुन त्यांनी रेल्वेमंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. देश आणि संसदेने त्यांच्या या अभूतपूर्व निर्णयाची प्रशंसा केली होती. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनीही त्यांच्या या इनामदार वृत्ती आणि आदर्श मूल्यांची संसदेत प्रशंसा केली होती. पंडित नेहरुंच्या आकस्मिक निधनानंतर देशाची धुरा त्यांच्याकडे आली. ९ जानेवारी १९६४ रोजी देशाचे दुसरे पंतप्रधान म्हणून त्यांनी शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांनी आपल्या कर्तुत्ववाने पंतप्रधानपदावर ठसा उमटविला. प्रखर राष्ट्रवादी असलेल्या शास्त्रीजींनी आपल्या पंतप्रधान कालावधीत देशहिताचे अनेक निर्णय घेतले. १९६५ साली पाकिस्तानने आगळीक करुन भारताशी युद्ध पुकारले. पण देशात लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असल्याने पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. आपल्या कणखर नेतृत्वाने त्यांनी पाकिस्तानला पराभूत केले. या युद्धानंतर त्यांच्या नेतृत्वाने जगातील मातब्बर नेते प्रभावित झाले. जय जवान, जय किसान या त्यांच्या मंत्राने देश भारावून गेला. लालबहादूर शास्त्री हे अवघे १९ महिने पंतप्रधान होते. या १९ महिन्यांच्या कालावधीत जनसामान्यांच्या हृदयात त्यांनी अढळ स्थान मिळवले. ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे निधन झाले. जयंतीदिनी शास्त्रीजींना विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## आ. रोहित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन

*कर्जत-जामखेडमधील तरुण-तरुणींना रोजगाराची संधी*

**कर्जत-जामखेड - प्रतिनिधी**

कर्जत-जामखेड मतदारसंघातील तरुण-तरुणींना रोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आ. रोहितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. बारामती ॲग्रो लिमिटेड व कर्जत-जामखेड एकात्मिक विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच रयत शिक्षण संस्था, उत्तर विभाग यांच्या सहकार्याने हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. कर्जत-जामखेड मतदारसंघातील युवकांना रोजगाराच्या माध्यमातून सक्षम करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यात विविध औद्योगिक क्षेत्रांतील नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. त्यामुळे स्थानिक तरुणांना आपल्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी मिळणार असून, पात्र उमेदवारांच्या थेट मुलाखती घेऊन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

या रोजगार मेळाव्याचे आयोजन कर्जत येथे शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत दादा पाटील महाविद्यालय येथे, तर जामखेड येथे शनिवार, दि. ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत नागेश विद्यालय व कन्या विद्यालय येथे करण्यात आले आहे. दहावी, बारावी उत्तीर्ण, कोणत्याही ट्रेडमधील आयटीआय, विविध पदविका अभ्यासक्रम तसेच .., .. आणि .. पदवीधारक उमेदवारांना या रोजगार मेळाव्यात सहभागी होता येणार आहे. ग्रामीण भागातील तरुणांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा मेळावा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. मुलाखतीसाठी येताना उमेदवारांनी आपल्या बायोडाटाच्या ३ ते ४ प्रती, सर्व शैक्षणिक कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती, पासपोर्ट आकाराचे फोटो, आधार कार्ड व ओळखपत्र सोबत आणावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

कर्जत-जामखेडमधील जास्तीत जास्त युवक-युवतींनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घेऊन रोजगाराची संधी मिळवण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पदवीधर मतदारसंघ निवडणूक ध्वनीक्षेपकाच्या वापरावर निर्बंध

**जालना - प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक -२०२६ साठी कार्यक्रम दि.२२ सप्टेंबर २०२६ रोजी घोषित केला आहे. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे. सदर निवडणूकीच्या प्रचार मोहीमेच्या कालावधीत सर्व राजकीय पक्षाचे उमेदवार तसेच निवडणूक लढविणारे उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते आणि हितचिंतक हे वाहनांवर ध्वनीक्षेपक बसवून मोठ्या आवाजातून प्रचार केल्यास ध्वनी प्रदुषण होणे, सर्वसामान्य लोकांच्या जीवनातील शांततेस व स्वास्थास बाधा पोहोचण्याची व उशीरा रात्री पर्यंत ध्वनीक्षेपण यंत्रणा चालु ठेवण्याची शक्यता असल्यामुळे सदर बाबींवर निर्बंध घालणे आवश्यक आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ मधील प्राप्त अधिकारानुसार निवडणूकीच्या प्रचारासाठी ध्वनीक्षेपकाचे वापरावर निर्बंध घालण्यात आले आहेत, असे आदेश जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत.

ध्वनीक्षेपकाचा वापर पोलीस अधिकारी यांच्या परवानगी शिवाय करता येणार नाही. सकाळी ६ वाजण्यापूर्वी आणि रात्री १० वाजेनंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर व कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही.

पान १ व ४ वरुन...

### जालना जिल्ह्यात...

पाणी व चाऱ्याची टंचाई अधिक असलेल्या भागात गरजेनुसार अतिरिक्त चारा छावण्या सुरू कराव्यात.

जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीचा तातडीने आढावा घेऊन शेतकरी व पशुपालकांना आवश्यक ती मदत उपलब्ध करून द्यावी. दुष्काळग्रस्त शेतकरी व पशुपालकांच्या पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाने तातडीने चारा छावण्या सुरू करून आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी भाऊसाहेब घुगे यांनी केली. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रवीण फुके पाटील, मा. जि. प. सदस्य तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुभाषराव बोडखे पाटील आणि प्रगतिशील शेतकरी रामेश्वर दराडे उपस्थित होते.

### जिल्ह्यातील अपघातप्रवण...

राहणार नाही, पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधु सांगितले.

ब्लॅक स्पॉटवर सुरक्षा उपाययोजना केल्यानंतर अपघातांमध्ये प्रत्यक्षात किती घट झाली, याचा आढावा घेण्यात येणार आहे. त्यासाठी उपाययोजनांपूर्वी आणि त्यानंतर झालेल्या अपघातांचा तुलनात्मक अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश पोलीस विभागाला देण्यात आले. मागील दोन-तीन बैठकींत सूचना करूनही प्रलंबित कामे पूर्ण न झाल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने कामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले. जालना, अमरावती, अकोला आणि छत्रपती संभाजीनगर येथील राष्ट्रीय महामार्ग विभाग तसेच भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या () छत्रपती संभाजीनगर कार्यालयाला प्रलंबित कामांसाठी सात दिवसांची अंतिम मुदत देण्यात आली. महावितरणकडून रस्त्यालगत सुरक्षेच्या दृष्टीने अडथळा निर्माण करणाऱ्या पद्धतीने अनधिकृत विद्युत खांब उभारले जात असल्याची बाब बैठकीत निदर्शनास आणण्यात आली. याची दखल घेत पुढील बैठकीत महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले. या प्रकरणाचा सविस्तर आढावा घेऊन आवश्यक ती कारवाई केली जाणार आहे. चंदनझिरा परिसरातील अपघातांशी संबंधित प्रलंबित कामांचा आढावा घेण्यासाठी पुढील बैठकीस एमआयडीसी बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच इंद्रायणी हॉटेलसमोरील अपघातप्रवण ठिकाणी आवश्यक सुरक्षा उपाययोजना तातडीने करण्याचे निश्चित करण्यात आले. रस्त्यांवरील प्रकाश व्यवस्था सुधारण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने २६ ब्लॅक स्पॉटवर फ्लड लाईट्स बसविण्याचे अंदाजपत्रक सादर केले आहे. या अंदाजपत्रकाची इतर एजन्सींच्या प्रस्तावांशी तुलना करण्यात येत असून, योग्य एजन्सीची निवड करून कामाचा अंतिम आदेश देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी परस्पर समन्वय वाढवून प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश बैठकीत देण्यात आले.

### प्रलंबित अपील...

आपली बाजू मांडावी, असे आवाहन करण्यात आले आहे.लोकअदालतीचे ठिकाण : जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, जालना यांचे कार्यालय सुनावणीची तारीख : ६ ऑक्टोबर २०२६ वेळ : सकाळी ११ वाजता

संबंधित नागरिकांनी लोकअदालतीचा लाभ घेऊन प्रलंबित प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कृष्णकांत कणसे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### लिहा येथे मटका...

येत आहे. जालना जिल्ह्यात मटका, जुगार तसेच इतर अवैध व्यवसायांविरोधात पोलिसांकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. शहरासह ग्रामीण भागातही अशा प्रकारच्या अवैध व्यवसायांची माहिती मिळताच संबंधित ठिकाणी कारवाई केली जात आहे. या पार्श्वभूमीवर लिहा येथील कारवाईकडे पाहिले जात आहे. अवैध मटका-जुगारामुळे नागरिकांची आर्थिक फसवणूक होण्याबरोबरच परिसरात अवैध आर्थिक व्यवहारांना चालना मिळण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून कारवाईची मोहीम अधिक तीव्र करण्यात आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

ही कारवाई एसपी स्क्वॉडच्या क्यूआरटी पथकाने केली. पथकात सपोनि अविनाश गडाख, पोउपनि दिनेश बर्डे, पोहवा सचिन कोकणे, मपोशि धानेश्वरी गुंडु, चापोशि नंदकिशोर जैवाळ, पोकॉ १४०९ हरबक, पोशि १२९१ नागवे, पोशि १३६९ रांजणे आणि पोशि १७३३ हाळदे यांचा समावेश होता. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीरसिंग संधू यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईनंतर संबंधिताविरुद्ध कायद्यानुसार पुढील प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. जिल्ह्यातील अवैध मटका व जुगार व्यवसायाविरोधात आगामी काळातही धडक कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### जिरडगाव खून...

पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. अटक करण्यात आलेल्या दोन्ही आरोपींना १ ऑक्टोबर २०२६ रोजी न्यायालयासमोर रिमांडसाठी हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने दोन्ही आरोपींना तीन दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली आहे.

पोलीस कोठडीदरम्यान गुन्ह्यातील अन्य बाबी, घटनाक्रम, वापरण्यात आलेले शस्त्र तसेच आरोपींच्या परस्पर भूमिकेबाबत अधिक तपास करण्यात येणार आहे. या खून प्रकरणाचा तपास पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि अंबडचे उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

घनसावंगी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक केतन राठोड यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक अशोक खरात, पोलीस उपनिरीक्षक अजित चाटे, पोलीस हवालदार साईनाथ पवार, पोलीस कॉन्स्टेबल कृष्णा मुळे, राधेश्याम गुसिंगे आणि सर्जेराव तिकांडे यांच्या पथकाने ही कारवाई केली. गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या २४ तासांच्या आत आरोपींचा शोध घेऊन दोघांना अटक करण्यात पोलिसांना यश आले. गोपनीय माहिती, तांत्रिक विश्लेषण आणि स्वतंत्र तपास पथकांच्या माध्यमातून तपासाला वेग देण्यात आला. त्यामुळे जिरडगाव खून प्रकरणातील संशयित आरोपी पोलिसांच्या ताब्यात आले असून, आता पोलीस कोठडीदरम्यान होणाऱ्या तपासातून या प्रकरणातील आणखी बाबी समोर येण्याची शक्यता आहे.

### सीईओंच्या...

सहभाग घेतला. स्वच्छता ही केवळ एका दिवसाची मोहीम न राहता ती ग्रामस्थांच्या दैनंदिन जीवनाचा भाग व्हावी, या उद्देशाने विविध गावांमध्ये जनजागृतीही करण्यात आली. सामूहिक सहभागातून गाव परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेश देण्यात आला.

सीईओ डॉ. कृष्ण कांत कनवारिया यांच्या आवाहनाला मिळालेल्या या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे 'एक दिवस, एक तास, एक सोबत' उपक्रमाला लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले . उपमुख्य कार्यकारी अधिकारी लिंबाजी बारगिरे, यांच्या नेतृत्वाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

### जालन्यात उद्या...

धनुर्विद्या खेळाडूंना मोठी प्रेरणा मिळणार असून, जालना हे धनुर्विद्येचे महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित होण्यास या स्पर्धेची निश्चितच मदत होणार आहे. शासनाने धनुर्विद्येसाठी केली भरघोस तरतूद प्रमोद चांदूरकर,सचिव,महाराष्ट्र राज्य धनुर्विद्या संघटना.

जालना : धनुर्विद्या या पारंपरिक तसेच आधुनिक क्रीडा प्रकाराच्या विकासासाठी शासनाने यंदा भरघोस आर्थिक तरतूद केली असून राज्यातील खेळाडू,प्रशिक्षक आणि धनुर्विद्या केंद्रांना याचा मोठा लाभ होणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य धनुर्विद्या संघटनेचे सचिव प्रमोद चांदूरकर यांनी दिली.धनुर्विद्येला अधिक व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात विविध स्तरांवर स्पर्धा,प्रशिक्षण शिबिरे आणि क्रीडा सुविधा विकसित करण्यावर भर दिला जात आहे. ग्रामीण व शहरी भागातील गुणवंत खेळाडूंना प्रोत्साहन देऊन त्यांना राज्य,राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी उपलब्ध करून देण्याचे काम संघटनेच्या माध्यमातून सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

### गांधी जयंतीनिमित्त...

समजावून सांगण्यात आले. चरखा हा केवळ सूत कातण्याचे साधन नसून श्रमप्रतिष्ठा, स्वदेशी, आर्थिक स्वावलंबन आणि आत्मनिर्भरतेचे प्रतीक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. गांधीजींचे विचार केवळ जयंतीपुरते मर्यादित न ठेवता ते दैनंदिन जीवनात आचरणात आणण्याची गरज असल्याचे उपस्थितांनी अधोरेखित केले. सामाजिक सलोखा, धार्मिक सौहार्द, अहिंसा, बंधुता आणि माणुसकी या मूल्यांची आजच्या सामाजिक परिस्थितीत अधिक गरज असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. गांधीजींच्या विचारांना अभिवादन करण्याबरोबरच ते नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा आणि सामाजिक जीवनात सत्य, अहिंसा, बंधुता, सर्वधर्मसमभाव आणि माणुसकीची मूल्ये रुजविण्याचा संदेश देण्यात आला.

**गांधी-शास्त्री जयंतीनिमित्त अभिवादन**

यावेळी राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त उपस्थितांनी अभिवादन केले. गांधीजी आणि शास्त्रीजी यांच्या विचारांशी बांधील राहण्याची सामूहिक प्रतिज्ञाही करण्यात आली. कार्यक्रमास जालना जिल्हा सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष प्रा. सत्संग मुंडे, सचिव विशाल तौर, संघटक आकाश गायकवाड यांच्यासह सल्लागार मंडळातील कॉम्रेड अण्णा सावंत, डॉ. राधेश्याम जैस्वाल, प्रा. डॉ. जवाहर काबरा, प्रा. डॉ. बसवराज कोरे, कॉम्रेड सगीर अहमद, प्रा. डॉ.रावसाहेब ढवळे, प्रा. डॉ. नारायणराव बोराडे, प्रा. सुभाष देठे, मिर्झा अफसर शेख, प्रा. डॉ. यशवंत सोनवणे, फिरोज बागवान, बाबासाहेब सोनवणे यांच्यासह शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक, नागरिक आणि बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सेवलीत अप्पर तहसील...

आंदोलन करण्यात आले. आंदोलनामुळे परिसरातील जनजीवन आणि वाहतुकीवर मोठा परिणाम झाला.

आंदोलकांच्या म्हणण्यानुसार, २२ सप्टेंबर २०२६ रोजी नेर येथे अप्पर तहसीलदार कार्यालय कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. हा शासन निर्णय तात्काळ रद्द करून सेवली येथेच अप्पर तहसील कार्यालय स्थापन करण्याबाबत स्वतंत्र शासन आदेश काढावा, अशी आंदोलकांची प्रमुख मागणी आहे.

नेर येथे कार्यालय सुरू करण्याच्या निर्णयाला सेवली परिसरातील नागरिकांनी विरोध दर्शविला असून, शासनाने या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

मौजे सेवली येथे अप्पर तहसील कार्यालय स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदी तसेच मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियमातील तरतुदींचा विचार करून आवश्यक प्रक्रिया राबवावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. आंदोलकांच्या म्हणण्यानुसार, सेवली हे जालना तालुक्यातील प्रमुख प्रशासकीय केंद्र आहे. येथे पोलीस ठाणे, प्राथमिक आरोग्य केंद्र, बँका, बाजारपेठ, शाळा-महाविद्यालये यांसह विविध शासकीय आणि नागरी सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिकांना प्रशासकीय कामांसाठी सुलभता मिळावी, यासाठी अप्पर तहसील कार्यालय सेवली येथेच असणे आवश्यक असल्याचा दावा आंदोलकांनी केला आहे.

तसेच उपविभागीय अधिकाऱ्यांनी सेवली येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्याच्या मागणीबाबत सकारात्मक अहवाल दिल्याचेही आंदोलकांचे म्हणणे आहे. बाजारपेठ बंद आणि त्यानंतर रास्ता रोको झाल्याने प्रशासनासमोर आंदोलनाची तीव्रता स्पष्ट झाली.या आंदोलनात सतीश शिवलिंगआप्पा डुमे, परमेश्वर गाडेकर (सरपंच, वरखेडा) आणि तानाजी राऊत यांच्यासह नागरिक सहभागी झाले आहेत. शासनाने तातडीने आंदोलनाची दखल घेऊन सेवली येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.''हा लढा केवळ एका शासकीय कार्यालयासाठी नसून सेवली आणि परिसरातील नागरिकांच्या प्रशासकीय सोयी, हक्क आणि अस्मितेचा प्रश्न आहे,'' अशी भूमिका आंदोलकांनी मांडली आहे. मागणी मान्य होईपर्यंत आमरण उपोषण आणि आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला आहे.

# खेडी आणि शहरे- बिघडत चाललेले संतुलन



'चला खेड्याकडे चला' असा संदेश एकेकाळी दिला होता. भारत हा खेड्यांचा देश आहे, असे आपण अभिमानाने सांगायचो. पण आज एकविसाव्या शतकात परिस्थिती पूर्णपणे उलटी झाली आहे. आजचा तरुण म्हणतोय, 'शहराकडे चला !' खेड्यांची माती, तिथली संस्कृती आणि शुद्ध हवा सोडून शहराच्या सिमेंटच्या जंगलात हरवून जाण्यासाठी आज ग्रामीण भागातल्या तरुणांची झुंबड उडालेली आहे. त्यामुळेच आज आपली खेडी ओस पडत चालली आहेत आणि शहरे मात्र लोकसंख्येच्या ओझ्याखाली दबून गुदमरत आहेत. हा केवळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी होणारा लोकांचा प्रवास नाही, तर ही एका संपूर्ण संस्कृतीची, ग्रामीण अर्थव्यवस्थेची आणि शेती परंपरेची होणारी भयंकर पडझड आहे.शहरी झगमगाट आणि नोकरीचे आकर्षणआजच्या तरुण पिढीला शेतात घाम गाळण्यापेक्षा शहरातल्या वातानुकूलित (ए.सी ) केबिनमध्ये बसून नोकरी करण्याचे प्रचंड आकर्षण आहे. शहरातला तो चकचकाट, मॉल संस्कृती, नाईट लाईफ, टोलेजंग इमारती आणि दरमहा खात्यात जमा होणारा निश्चित पगार या गोष्टी ग्रामीण तरुणांना भुरळ पाडत आहेत. शहरात राहण्यात एक प्रकारची प्रतिष्ठा () आहे, असा एक सुप्त समज तरुणांच्या मनात घर करून बसला आहे. याउलट, खेड्यात राहणाऱ्या आणि शेती करणाऱ्या तरुणाला समाजात, लग्नाच्या बाजारात दुय्यम स्थान दिले जाते. हा सामाजिक दृष्टिकोन तरुणांना शहराकडे जाण्यासाठी भाग पाडत आहे. शहरात १० ते १५ हजारांची नोकरी करून, एका छोट्या खोलीत कोंदट वातावरणात राहणे तरुण पसंत करत आहेत, पण स्वतःच्या मालकीच्या शेतीत राबण्याची त्यांची तयारी राहिलेली नाही. शेतीकडे फिरवलेली पाठ आणि निसर्गाचा लहरीपणा. ज्या शेतीने पिढ्यानपिढ्या देशाला अन्न दिले, त्याच शेतीकडे आजची तरुण पिढी पूर्णपणे पाठ फिरवत आहे. पण याला फक्त तरुणांची मानसिकता कारणीभूत नाही, तर शेती क्षेत्रातील वाढती अनिश्चितता जबाबदार आहे. वर्षभर रक्ताचे पाणी करूनही हातात काय पडणार याची शाश्वती नसते. कधी अस्मानी संकट तर कधी सुलतानी संकट ! कधी कोरडा दुष्काळ, कधी ओला दुष्काळ, तर कधी अवकाळी पाऊस आणि गारपीट. या नैसर्गिक आपत्तींमधून पीक वाचलेच, तर बाजारपेठेत त्याला कवडीमोल भाव मिळतो. निसर्गाचा लहरीपणा, पिकाला न मिळणारा हमीभाव, खते-बियाणांचे वाढते भाव आणि कर्जाचा डोंगर या दुष्टचक्रामुळे शेती हा तोट्याचा व्यवसाय बनला आहे. यामुळेच शेतकरी बापाची धडपड असते की आपल्या मुलाने शेतीच्या वाट्याला न जाता शहरात जाऊन कुठलीही नोकरी करावी. ज्या हातांनी देशाची धान्याची कोठारे भरायची, ते उमदे हात आज शहरातल्या कंपन्यांमध्ये सुरक्षा रक्षक, डिलिव्हरी बॉय किंवा हॉटेलमध्ये वेटर बनून राबत आहेत, ही अत्यंत खेदजनक आणि गंभीर बाब आहे.

सिमेंटचे जंगल आणि आक्रसत चाललेले शेतीक्षेत्रशहराकडे वाढणाऱ्या या मानवी ओढ्यामुळे शहरांच्या सीमा आता खेड्यांपर्यंत येऊन पोहोचल्या आहेत. शहरात येणाऱ्या लाखो लोकांच्या लोंढ्यांना सामावून घेण्यासाठी प्रचंड प्रमाणावर नवीन बांधकामे सुरू आहेत. मोठमोठे टॉवर्स,आकर्षित करणाऱ्या ईमारती, आलिशान गृहप्रकल्प, कारखाने आणि हायवे यांच्या नावाखाली गावागावांतील सुपीक शेतजमीन अक्षरशः गिळंकृत केली जात आहे. दरवर्षी शेतीचे क्षेत्र झपाट्याने कमी होत चालले आहे. बिल्डर लॉबी खेड्यातील शेतकऱ्यांना पैशांचे आमिष दाखवून जमिनी विकत घेत आहे आणि तिथे सिमेंटचे जंगल उभे करत आहे. आपण हे विसरतोय की कॉक्रीटच्या इमारतींमधून धान्य पिकत नाही. जर शेतीच उरणार नाही, तर या शहरात राहणारी कोट्यवधी पोटे काय खाणार? पैशांचे बंडल खाऊन माणूस जगू शकत नाही, त्याला अन्नच हवे असते. पण विकासाच्या या आंधळ्या शर्यतीत आपण विनाशाकडे वाटचाल करत आहोत.

ग्रामीण शिक्षण व्यवस्थेची दुरवस्था आणि इंग्रजीचा अट्टहास या सामूहिक स्थलांतराचा सर्वात मोठा आणि जीवघेणा फटका ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेला बसला आहे. एकेकाळी गजबजणाऱ्या, मुलांच्या किलबिलाटाने फुलणाऱ्या जिल्हा परिषदेच्या आणि गावच्या शाळा आज ओस पडत आहेत. गावेच्या गावे रिकामी होत असल्यामुळे शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या खालावत चालली आहे. पटसंख्या अभावी दरवर्षी शेकडो ग्रामीण शाळांना कुलुपे लागत आहेत. याला दुसरी बाजू म्हणजे पालकांमध्ये पाल्याला 'कॉन्व्हेंट' म्हणजेच इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकवण्याचा वाढलेला अट्टहास. इंग्रजी बोलता येणे म्हणजे हुशार आणि मराठी माध्यमातून शिकणे म्हणजे मागे पडणे, मागासलेपणा असा एक चुकीचा आणि घातक समज समाजात रूढ झाला आहे. खेड्यात दर्जेदार इंग्रजी शाळा नसल्यामुळे, पालकांनी आपल्या मुलांना शहरातल्या इंग्रजी शाळांमध्ये पाठवणे सुरू केले आहे. अनेक कुटुंबे केवळ मुलांच्या इंग्रजी शिक्षणासाठी खेड्यातले घर सोडून तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या शहरात भाड्याने राहत आहेत. परिणामी, गावच्या मराठी शाळा ओस पडत आहेत आणि पर्यायाने गावची संस्कृतीच लयाला जात आहे.ग्रामीण भागातील आरोग्य सुविधांचा भीषण अभावखेड्यांकडून शहरांकडे होणाऱ्या या स्थलांतराचे एक मुख्य कारण म्हणजे ग्रामीण भागातील मोडकळीस आलेली आरोग्य व्यवस्था. आजही अनेक गावांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र केवळ नावालाच उरली आहेत. तिथे ना वेळेवर डॉक्टर असतात, ना पुरेशी औषधे. एखाद्या आपत्कालीन प्रसंगी किंवा गंभीर आजारपणात रुग्णाला थेट शहरात धाव घ्यावी लागते. वेळेवर रुग्णवाहिका न मिळणे, गरोदर महिलांना प्रसूतीसाठी मैलोन्मैल प्रवास करावा लागणे किंवा वेळेत उपचार न मिळाल्याने वाटेतच जीव गमवावा लागणे, या भीषण वास्तवाला ग्रामीण जनता अजूनही तोंड देत आहे. चांगल्या आरोग्य सुविधा, सुसज्ज रुग्णालये आणि जीव वाचवण्याची हमी शहरात मिळते, याच विश्वासाने कित्येक कुटुंबे गाव सोडून शहरात कायमची स्थायिक होत आहेत. शहरांमधील लोकसंख्या फुगवटा, वाढती गुन्हेगारी आणि प्रदूषणाचा विळखा गावाकडून येणाऱ्या लोंढ्यांमुळे शहरांची अवस्था आज दिसते तशी नाही. अवाजवी लोकसंख्येमुळे शहरे आता नरक बनू लागली आहेत. वाहनांच्या धुरामुळे हवेचे प्रदूषण इतके वाढले आहे की, लहान मुलांना आणि वृद्धांना श्वसनाचे गंभीर आजार जडले आहेत. पाण्याचे दुर्भिक्ष, कचेऱ्यांचे ढीग आणि झोपडपट्ट्यांची अनियंत्रित वाढ यामुळे शहरांचे सामाजिक आरोग्य धोक्यात आले आहे. या गर्दीत प्रत्येकालाच रोजगार मिळेल असे नाही. परिणामी, बेरोजगार तरुण नैराश्यातून गुन्हेगारीकडे वळत आहेत. चोरी, दरोडे, अंमली पदार्थांचे जाळे आणि महिलांवरील अत्याचार शहरांमध्ये झपाट्याने वाढत आहेत. ज्या शांततेच्या आणि सुरक्षेच्या शोधात माणूस शहरात येतो, ती शांतता आधुनिक शहरांमधून पार नाहीशी झाली आहे. खेडी वृद्धाश्रम बनत चाललेलीआहे. आज खेड्यांची अवस्था पाहिली तर अंगावर काटा येतो. गावात फक्त वृद्ध आई-वडील, आजी-आजोबा उरले आहेत. तरुण रक्त शहरात निघून गेल्यामुळे गावातील ऊर्जाच नष्ट झाली आहे. सण-उत्सव, जत्रा ज्या उत्साहात साजरी व्हायची, तिथे आज शांतता पसरली आहे. एखाद्या घरात म्हातारे आई-वडील आजारी पडले, तर त्यांना पाणी देणारेही शेजारी उरलेले नाहीत. गावे केवळ नावाला उरली असून ती एकप्रकारे ओपन एअर वृद्धाश्रम बनत चालली आहेत.आता तरी जागे होण्याची वेळ आली आहे !खेडी ओस पडणे आणि शहरे फुगत जाणे ही आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी आणि सामाजिक आरोग्यासाठी एक अत्यंत धोक्याची घंटा आहे. जर हा ओढा असाच राहिला, तर लवकरच संपूर्ण व्यवस्था कोलमडून पडेल. शहरात राहून आपण कितीही पैसे कमावले, तरी भूक भागवण्यासाठी शेती आणि शेतकरीच लागणार आहे, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. म्हणूनच, आता नुसती चिंता करून चालणार नाही, तर चिंतन आणि कृती करण्याची वेळ आली आहे. सरकारने आणि समाजाने मिळून ग्रामीण भागातच रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण केल्या पाहिजेत. शेतीला प्रतिष्ठा, आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन तो एक नफा देणारा, मानाचा व्यवसाय कसा बनेल यावर काम केले पाहिजे. ग्रामीण भागातील शाळा आणि रुग्णालयांचा दर्जा सुधारून तिथेच दर्जेदार सुविधा मिळाल्या, तर शेतकरी शहर सोडून जाणार नाही. जोपर्यंत खेड्यांचा विकास केवळ कागदावर किंवा भाषणात न राहता प्रत्यक्षात उतरत नाही, तोपर्यंत हा शहराकडचा आत्मघातकी ओढा थांबणार नाही. आपली खेडी समृद्ध झाली, तरच देश खऱ्या अर्थाने महासत्ता बनेल !



**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव. मो. ८९९९५६६९१७**

# महाराष्ट्र वाल्मीकी गदिमा

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा यांची आज जयंती. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काहीकाळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले. हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहुन अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## महसूल मंत्र्यांनी गायरान जमीन सातबाराचा प्रश्न मार्गी लावावा -शिवसेना दलित आघाडी जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे यांची पत्रकार परिषदेत मागणी

**जालना - प्रतिनिधी**

दलित- आदिवासी- भूमिहीन कास्तकरांचा गायरान जमीन सातबाराचा प्रश्न महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मार्गी लावावा तसेच आदिवासींच्या जमिनींची होत असलेली खरेदी- विक्री थांबविण्याबाबत कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना दलित आघाडीचे जालना जिल्हाप्रमुख तथा गायरान कास्तकरांचे नेते ॲड. भास्कर मगरे यांनी केली आहे.

ॲड. मगरे यांनी नंदनवनकॉलनीतील त्यांच्या निवासस्थानी तातडीने पत्रकार परिषद घेवून उपरोक्त मागणी केली.यावेळी माहिती देतांना ॲड. मगरे पुढे म्हणाले की, शिवसेना दलित आघाडीच्या माध्यमातून आपण गेल्या अनेक वर्षांपासून गायरान जमीन सातबाराचा प्रश्न निकाली निघावा, यासाठी रस्त्यावरील आंदोलन करीत आहोत. दलित- आदिवासी- भूमिहीनांचे मोर्चेही काढले आहेत. २९ सप्टेंबर २०२५ रोजी गायरान जमीन सातबाराचा प्रश्न घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयावर जन आक्रोश मोर्चा काढला होता. या मोर्चानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकही बोलावली होती, या बैठकीत गायरान जमीन सातबाराचा प्रश्न निकाली निघेल, अशी अपेक्षा होती मात्र पुढे काहीही झाले नाही.

# मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न चिन्ह व सर्वत्र आक्रोश!

भारतात लोकशाही आहे त्या पध्दतीने संविधानाच्या माध्यमातून संपूर्ण नियमावली तयार करण्यात आली आहे त्यानुसार देश व देशाचा कारभार चालतो.परंतू यात जर कोणी चुका करीत असेल तर त्याच्या कठोर कारवाई झालीच पाहिजे.परंतु ज्ञानेश कुमार सारखे मुख्य निवडणूक आयुक्त यात ढवळाढवळ करून पदाचा दुरुपयोग करीत असेल तर त्यांना संविधानिक पदावर रहाण्याचा तिळमात्र अधिकार नाही. कारण भारतातील निवडणूक प्रक्रिया देश घडविते व त्यातून देशाचे सूत्रसंचालक चालत असते.परंतु ज्यावेळेस तीन निवडणुक आयुक्त असतात तेव्हा सर्वाणूमते निर्णय ग्राह्य धरण्यात येतो.

परंतु जेव्हा तिन्ही निवडणूक अधिकाऱ्यांमध्ये खटकते आणि ज्ञानेश कुमार सारखे निवडणूक आयुक्त दोन आयुक्तांच्या सुचना किंवा निर्णय ऐकत नाही किंवा धाब्यावर ठेवतात तेव्हा लक्षात येते की, ज्ञानेश कुमार सारखे आयुक्त मनमानी करीत असावेत.याच माध्यमातून ज्ञानेश कुमार यांनी एसआयआर प्रक्रियेत मोठा घोळ केला असुन निवडणूक प्रक्रियेत मोठी ढवळाढवळ केल्याचे चित्र देशापुढे स्पष्ट दिसत आहे. त्यामुळेच सर्वत्र आक्रोशाचे वातावरण पहायला मिळत आहे. आज संपूर्ण विरोधी पक्ष व सर्वसामान्य नागरिक ज्ञानेश कुमार यांच्यावर कारवाईची व निलंबनाची मागणी करीत आहे यावरून स्पष्ट होते की, ज्ञानेश कुमार यांनी मोठा घोळ केला असावा.कारण ज्ञानेश कुमार यांनी एसआयआर प्रक्रियेत मोठा घोळ करत देशातील अंदाजे १३ करोड मतदारांचे नाव कापले यात २ करोड ८० मृत्यू मतदार सांगितले जाते व बाकी १० करोड २० लाख मतदारांचे काय यावर ज्ञानेश कुमार यांनी चुप्पी साधल्याने संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत आणि त्यातूनच ज्ञानेश कुमार यांच्यावर चौतर्फा हल्ला सुरू झाला व आता ही बाब स्पष्ट झाली आहे की मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सरकारच्या सांगण्यावरूनच एसआयआर च्या माध्यमातून १० करोड २० लाख मतदारांचे नाव मतदार यादीतून वगळण्यात आले.त्यामुळे यावर सरकार ज्ञानेश कुमार यांच्यावर सरळ कारवाई करण्यास हिचकिचावतांना दिसत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, निवडणूक आयोगातील इतर दोन निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी नोव्हेंबर २०२५ ते ऑगस्ट २०२६ या काळात विशेष सखोल पुनरीक्षण (एस आय आर ) प्रक्रियेसह विविध निर्णयांवर किमान १४ वेळा लेखी आक्षेप व असहमती नोंदवली होती.परंतू मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी इतर आयुक्तांना विश्वासात न घेता किंवा त्यांच्या सल्ल्याविरुद्ध जाऊन फॉर्म ६ मधील बदल आणि मतदार यादी डेटाच्या केंद्रीकरणासारखे निर्णय एकतर्फी घेतल्याचा आरोप त्यांच्यावर आहेत.या एकतर्फी निर्णयामुळे देशभरात सुमारे १० करोड ८० लाख मतदार मतदार यादीतून वगळले गेल्याचा आणि पात्र मतदारांवर गदा आल्याचा दावा करण्यात आला आहे.यावरून स्पष्ट होते की, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार व सरकारमधील काही राजकीय पुढारी निवडणूक प्रक्रियेत अवश्य ढवळाढवळ करून घोळ करीत असावेत.२०२३ च्या कायद्यात निवडणूक आयुक्तांनी निर्णय शक्यतो एकमताने घ्यावेत,अशी तरतूद आहे.एकमत न झाल्यास बहुमताचा निर्णय अंतिम मानला जाईल.मुख्य निवडणूक आयुक्त एकतर्फी निर्णय घेत होते आणि त्यातून लाखो मतदारांची नावे अधिकृतपणे वगळली किंवा नव्याने समाविष्ट केली जात होती, हे नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका बातमीने समोर आल्याने देशात आक्रोश निर्माण झाला आहे. यावरून स्पष्ट होते ज्ञानेश कुमार अवश्य दोषी असावेत.त्यांनी केलेल्या चुका प्रेस कॉन्फरन्सच्या माध्यमातून ताबडतोब मिडिया समोर येऊन सांगाव्यात किंवा ताबडतोब आपल्या पदाचा राजीनामा द्यावा यासाठी सर्वच स्तरातून देशभरात मोठ्या प्रमाणात आंदोलनाला सुरुवात झाली आहे.सध्याच्या परिस्थितीत एस आय आर पध्दतीनेमध्ये भयंकर घोळ सुरू असल्याचे दिसून येते काहिंना जन्म दाखला मागत आहे, काहिंना आईची माहिती, वडिलांची,आजोबांची अशा अनेक प्रकारच्या नवीन-नवीन बाबी एस आय आर प्रक्रियेत निर्माण झाल्याने अनेकांना याबाबत नोटीस बजावली आहे यामुळे देशाचा सर्वसामान्य नागरिक सुद्धा व्दिधेत असल्याचे दिसून येते.एस आय आर मध्ये मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी आधारकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅनकार्ड, इलेक्शन कार्ड, इलेक्ट्रॉनिक बिल किंवा कोणताही आयडी प्रुफ गृहीत धरून एस आय आर प्रक्रिया सहज पूर्ण करता येते.परंतु सध्या एस आय आर मध्ये ज्ञानेशकुमार यांची मनमानी दिसून येत असून संविधानिक पदाचा गैरवापर करतांना दिसतात.

ज्ञानेशकुमार यांच्या कथीत घोळ प्रकरणात सरकारने अधिकृतरित्या उत्तर द्यावे सत्ताधारी राजकीय पक्षांनी किंवा पुढाऱ्यांनी यात ढवळाढवळ करू नये व राजकारण करण्याचा प्रयत्न करू नये.निवडणूक प्रक्रियेबद्दल सरकारला किंवा निवडणूक आयोगाला प्रश्न विचारण्याचा संपूर्ण अधिकार सर्वसामान्य जनतेला व विरोधकांना आहे याची जाणीव सरकारने ठेवावी.त्यामुळे त्यांच्या प्रश्नाचे उत्तर कायद्याच्या माध्यमातून सरकारने द्यायला पाहिजे.मृत व दुबार असलेल्यांची नावे वगळणे योग्य आहे याला कोणाचाही विरोध नाही आणि नसावा.परंतू रेगूलर मतदारांची आणि विशिष्ट लोकांची नावे काही कारण नसताना वगळणे योग्य नाही.मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात याचिका दाखल करण्यात आली आहे व दाखल केलेली याचिका ऐकण्यास सर्वोच्च न्यायालयाने सहमती दर्शवली आहे.यात ज्ञानेश कुमार यांनी इतर दोन निवडणूक आयुक्तांच्या मंजुरी शिवाय भारतीय निवडणूक आयोगाच्या नावाने अनेक निर्णय घेतले असा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. यावर सर्वोच्च न्यायालयात पुढील आठवड्यात सुनावणी होण्याची शक्यता आहे.मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या (एसआयआर) प्रक्रियेत भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण आडवाणी,परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड, दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि निवडणूक आयुक्त एस. एस. संधू यांच्यासह अनेक प्रमुख मतदारांच्या नोंदींमध्ये विसंगती आढळल्याने त्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.म्हणजे आतापर्यंत ज्या नेत्यांनी अनेक दशके मतदान केले त्यांच्या मतदारांच्या नोंदीमध्ये विसंगती येत असेल तर देशाच्या करोडो नागरिकांचे काय?याचे उत्तर ज्ञानेश कुमार यांनी प्रथम द्यायला हवे.तीन मुख्य निवडणूक आयुक्त असतांना फक्त स्वतःचा निर्णय ग्राह्य धरने म्हणजे ज्ञानेश कुमार यांची मनमानीच म्हणावी.त्यामुळे आता ज्ञानेश कुमार यांची सखोल चौकशी करून योग्य निर्णय घेण्याची वेळ आली.कारण ज्ञानेश कुमार यांच्या अनेक चुकीच्या निर्णयामुळे निवडणूक आयोगाच्या एसआयआर प्रक्रियेवर आणि निवडून प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. त्यामुळे ज्ञानेश कुमार हे कोणाच्या सांगण्यावरून काम करीत होते याबद्दल सुद्धा कारवाई झाली पाहिजे व उघडकीस आले पाहिजे.कारण ज्ञानेश कुमार यांच्यावर कारवाई झाली नाही तर लोकांचा निवडणूक आयोगावरील विश्वास उडायला वेळ लागणार नाही. निवडणूक आयोगाच्या चुकीच्या धोरणांमुळेच देशात पक्ष फुटी,आमदार-खासदार फुटी,वाटेल तेव्हा मुख्यमंत्री पदाची शपथ घेणे व घोडेबाजार या संपूर्ण घटनांचे प्रमाण देशात मोठ्या प्रमाणात वाढले आहेत.हा सर्व प्रकार सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे निर्माण झाला आहे आणि आता निवडणूक आयोगाच्या चुकीच्या धोरणाचे प्रायश्चित्त देशाच्या १४५ कोटी जनतेनी का म्हणून भोगावे? असे अनेक प्रश्न सध्याच्या परिस्थितीत उपस्थित होत आहेत. त्यामुळे मी महामहीम राष्ट्रपती व सुप्रीम कोर्ट यांना विनंती करतो की, निवडणूक प्रक्रियेतील एसआयआर मध्ये सुरू असलेला घोळ ताबडतोब थांबवून संपुष्टात आणावा व ज्ञानेश कुमार किंवा अन्य दोषींवर कठोर कारवाई करून संविधानिक पदावरून बर्खास्त करण्याचा निर्णय घ्यावा.यामुळे मतदारांना व लोकशाहीला योग्य न्याय मिळण्यास मोठी मदत होईल.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# वंचित महिलांच्या सक्षमीकरणासाठी क्रांती संस्था व टाटा समूहाचा स्तुत्य उपक्रम

## साक्षरतेनंतर आता १० शिलाई मशीनच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबनाचा धडा; ज्येष्ठ पत्रकार भाऊसाहेब पाटील मुके यांच्या हस्ते प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन

**परतूर - प्रतिनिधी**

''पारधी आणि भटके-विमुक्त समाजातील भगिनींना केवळ अक्षरांची ओळख करून देऊन न थांबता, त्यांना थेट स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी क्रांती संस्था आणि टाटा समूहाने उचललेले हे पाऊल खऱ्या अर्थाने क्रांतिकारी आहे. शिक्षणामुळे विचारांना योग्य दिशा मिळते, तर हातातील कौशल्यामुळे जगण्याचे खरे बळ लाभते. वर्षभराच्या साक्षरता वर्गामुळे या महिलांमध्ये शिक्षणाची आवड आणि आत्मविश्वासाची नवी उमेद जागृत झाली आहे,'' असे परखड प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार भाऊसाहेब पाटील मुके यांनी केले.

समाजाच्या मुख्य प्रवाहापासून वर्षानुवर्षे वंचित राहिलेल्या पारधी व भटके-विमुक्त प्रवर्गातील महिलांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य, सन्मान आणि स्वाभिमान निर्माण करण्यासाठी क्रांती संस्था व टाटा डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने १० शिलाई मशीन उपलब्ध करून मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन व कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ पत्रकार भाऊसाहेब पाटील मुके यांनी भूषवले, त्यावेळी ते बोलत होते.



पुढे बोलताना मुके म्हणाले की, ''शिलाई प्रशिक्षणाच्या माध्यमातून या भगिनी घरबसल्या अथवा स्वतःचा छोटा व्यवसाय सुरू करून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनू शकतील. जेव्हा कुटुंबातील स्त्री सक्षम होते, तेव्हा संपूर्ण कुटुंब आणि पुढची पिढी सक्षम होते. या महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना स्थानिक पातळीवर हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी पत्रकारिता आणि सामाजिक पातळीवरून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल.''

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार राजकुमार भारूका, कैलास चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते सचिन काटे, क्रांती संघटनेचे राजेश थोरात तसेच टाटा पॉवरचे प्रतिनिधी करण चाटे, श्रेयस देवगिरी व प्रियवर्धक कुमार आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना सामाजिक कार्यकर्ते सचिन काटे म्हणाले की, ''उपेक्षित घटकांपर्यंत विकासाची फळे पोहोचवणे हे अत्यंत आव्हानात्मक काम असते; मात्र क्रांती संस्थेने सातत्यपूर्ण पाठपुरावा करून या महिलांमध्ये नवा विश्वास निर्माण केला आहे. साक्षरतेनंतर थेट व्यावसायिक कौशल्य शिकवले जात असल्याने या महिला केवळ कामगार न राहता सूक्ष्म उद्योजक बनण्याच्या दिशेने वाटचाल करतील.''

टाटा पॉवर व टाटा डेव्हलपमेंटच्या प्रतिनिधींनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''टाटा समूहाचा मुख्य उद्देश शेवटच्या घटकाचा सर्वांगीण विकास साधणे हाच आहे. पारधी समाजातील महिलांमध्ये प्रचंड जिद्द आणि मेहनत करण्याची तयारी आहे, त्यांना केवळ योग्य संधीची गरज होती. या प्रशिक्षणात कपडे कटिंग, शिलाई, फॅशन डिझायनिंगपासून ते बाजारपेठेतील मागणीनुसार कपडे तयार करण्याचे परिपूर्ण प्रशिक्षण दिले जाईल. भविष्यात या महिलांना स्वतःचा व्यवसाय उभा करण्यासाठी आवश्यक ते सर्व तांत्रिक व संस्थात्मक सहकार्य टाटा समूहाच्या माध्यमातून दिले जाईल. यावेळी शिलाई मशीन प्रशिक्षक आशा सूर्यवंशी यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थी महिलांना आगामी अभ्यासक्रम, प्रात्यक्षिके आणि प्रशिक्षणाच्या रूपरेषेविषयी सविस्तर माहिती दिली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्रांती संस्थेचे मधुकर थोरात, प्रकाश सोनवणे, विजय पवार, संतोष चव्हाण, मीना चव्हाण, दुर्गा पवार, मंगला काळे व मथुरा काळे यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे नेटके व प्रभावी सूत्रसंचालन राजेश थोरात यांनी केले, तर उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या उद्घाटन सोहळ्याला परिसरातील नागरिक, समाजबांधव आणि मोठ्या संख्येने प्रशिक्षणार्थी महिला उपस्थित होत्या.

# ०५- औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक -२०२६ सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरणास प्रतिबंध

**जालना - प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक -२०२६ साठी कार्यक्रम दि.२२ सप्टेंबर २०२६ रोजी घोषित केला आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निवडणूकीच्या कालावधीत शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात विद्रुपीकरण करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत. असे आदेश जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत.

निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनाकांपासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे. काही व्यक्ती, संस्था यांच्याकडुन मोठ्या प्रमाणात अनाधिकृत होर्डिंग्ज, बॅनर्स, पोस्टर्स व भिंतीवर जाहिराती लावून शहराचे विद्रुपीकरण करण्यात आले आहे. तसेच निवडणूक कालावधीत राजकीय पक्ष अथवा पक्षाशी संबंधीत व्यक्ती, संस्था यांच्याकडून होर्डिंग्ज, बॅनर्स, पोस्टर्स व भिंतीवर जाहीराती लावून शहराचे विद्रुपीकरण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारत निवडणूक आयोगाने मालमता विद्रुपीकरण करण्यास प्रतिबंध करण्यासंबंधी दिलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सूचित केल्यानुसार महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत व ग्रामीण भागात निवडणूकीच्या कालावधीमध्ये होर्डिंग्ज, बॅनर्स, पोस्टर्स व भितीवर जाहिरात प्रदर्शित करतांना संबंधित स्थानिक प्राधिकरणाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच परवानगी संपल्यानंतर ते नष्ट करुन इमारती, मालमत्ता पूर्ववत करुन घेणे, जाहिराती तात्काळ काढून घेणे आवश्यक आहे. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे. हे आदेश दि. ३० सप्टेंबर, २०२६ ते दि. ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत संपूर्ण जिल्हा हद्दीत लागु राहतील.

# सेवा संकल्प अभियान; सफाई मित्रांची आरोग्य तपासणी आणि सुरक्षेबाबत मार्गदर्शन

**जालना -प्रतिनिधी**

सेवा संकल्प अभियान तसेच 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत सफाई मित्र सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा एक भाग म्हणून भोकरदन नगरपरिषदेच्या वतीने शहरातील सर्व सफाई कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या तपासणीदरम्यान सफाई कामगारांची प्राथमिक आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच रक्तदाब, रक्तातील साखर आणि आवश्यक त्या इतर आरोग्यविषयक तपासण्या करण्यात आल्या. सफाई कामगार शहर स्वच्छ ठेवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने त्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी करणे आणि आरोग्याबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे. यावेळी सफाई कामगारांना वैयक्तिक सुरक्षा साधनांचा योग्य वापर, स्वच्छतेचे काम करताना घ्यावयाची खबरदारी, सुरक्षित पद्धतीने काम करण्याच्या उपाययोजना तसेच नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या सफाई मित्रांच्या योगदानाचे भोकरदन नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने कौतुक करण्यात आले. सफाई मित्रांचे आरोग्य व सुरक्षा यांना प्राधान्य देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. मुख्याधिकारी गजानन हरी तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमास नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी तसेच आरोग्य विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# जालना जिल्ह्यात 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत आरोग्य जनजागृतीला वेग

**जालना - प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या निर्णयानुसार १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत जालना जिल्ह्यात विविध आरोग्यविषयक उपक्रम घेण्यात येत आहेत. या उपक्रमांमधून महिला व मुलींचे आरोग्य, लसीकरण तसेच ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्य तपासणीबाबत जनजागृती करण्यात आली.

तीर्थपुरी येथील मराठवाडा विद्यालयात लसीकरणाबाबत माहिती व जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी विद्यार्थिनींना विषाणूमुळे होणारे आजार, गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग टाळण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाय आणि लसीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच लसीकरणाबाबत असलेले गैरसमज दूर करून 'प्रतिबंध हाच उपचाराचा उत्तम मार्ग' हा संदेश देण्यात आला. गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग हा महिलांमध्ये आढळणाऱ्या कर्करोगांपैकी एक प्रमुख आजार असल्याने लसीकरणाबाबत जनजागृती वाढविण्यावर भर देण्यात आला. या उपक्रमामुळे किशोरवयीन मुली तसेच महिलांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली.

तसेच 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' या उपक्रमांतर्गत श्री गणेश आयुर्वेद शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात उपस्थित नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच रक्तातील साखर तपासणी करून आवश्यकतेनुसार नागरिकांना औषधोपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

आरोग्यविषयक तक्रारींबाबतही नागरिकांना आवश्यक सल्ला देण्यात आला. या शिबिरात एकूण ३६८६ लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबिरामुळे परिसरातील नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती वाढली आहे.

# ग्राहकाला परतावा न देणे ॲमेझॉनला पडले महाग; ग्राहक आयोगाने ठोठावला दंड!

**जालना - प्रतिनिधी**

ऑर्डर रद्द झाल्यानंतरही ग्राहकाचे पैसे परत न करणे ऑनलाइन खरेदी क्षेत्रातील नामांकित कंपनी ॲमेझॉनला चांगलेच महागात पडले आहे. जिल्हा ग्राहक वाद निवारण आयोग (कांगडा, धरमशाला) यांनी ॲमेझॉन सेलर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडला सेवेतील त्रुटी आणि अनुचित व्यापार पद्धतीचा अवलंब केल्याप्रकरणी ग्राहकाची मूळ रक्कम व्याजासह परत करण्याचे तसेच भरपाई देण्याचे सक्त आदेश दिले आहेत. सविस्तर वृत्तानुसार, हिमाचल प्रदेशातील जवाली येथील रहिवासी शुभम पटियाल यांनी २६ सप्टेंबर २०२४ रोजी ॲमेझॉनवरून ८,८१९.१० रुपयांचा ऑनलाइन आगाऊ भरणा करून वेकफिट मॅट्रेस मागवली होती. मात्र, ठरलेल्या वेळेत वस्तूची डिलिव्हरी न झाल्याने डिलिव्हरी कंपनीच्या सूचनेनुसार ७ ऑक्टोबर २०२४ रोजी ओटीपी द्वारे ही ऑर्डर रद्द करण्यात आली. वस्तू विक्रेत्याकडे १६ ऑक्टोबर रोजी सुरक्षित परत पोहोचल्यानंतरही ॲमेझॉनच्या प्रणालीवर अपेक्षित परतावा चक्क ० रुपये दाखवण्यात आला. वारंवार संपर्क करूनही कंपनीकडून पैसे परत न मिळाल्यामुळे अखेर त्रस्त ग्राहकाने ग्राहक आयोगात धाव घेतली. या प्रकरणात आयोगाचे अध्यक्ष हिमांशू मिश्रा, सदस्या आरती सूद आणि सदस्य नारायण ठाकूर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. नोटीस मिळूनही ॲमेझॉनतर्फे कोणीही हजर न राहिल्याने आयोगाने त्यांच्याविरुद्ध एकतर्फी कारवाई करत हा निकाल दिला. आयोगाने ॲमेझॉन कंपनीला आदेश दिला आहे की, त्यांनी तक्रारदाराला ८,८१९.१० रुपये ही रक्कम तक्रार दाखल केल्याच्या तारखेपासून ९ टक्के वार्षिक व्याजासह परत करावी. याव्यतिरिक्त ग्राहकाला झालेल्या मानसिक त्रासाबद्दल ५,००० रुपये भरपाई आणि तक्रार खर्चापोटी ५,००० रुपये असे एकूण अतिरिक्त १०,००० रुपये देण्याचेही स्पष्ट निर्देश दिले आहेत.

या निकालावर प्रतिक्रिया देताना ॲड. महेश धन्नावत म्हणाले की, ''ऑनलाइन खरेदी करताना ग्राहकांची दिशाभूल करणे आणि ऑर्डर रद्द झाल्यानंतर पैसे अडवून ठेवण्याच्या प्रवृत्तीला या निकालामुळे मोठा चाप बसेल. अनेक नामांकित ऑनलाइन कंपन्या ग्राहकांच्या हक्कांकडे दुर्लक्ष करतात. मात्र, ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत ग्राहकांना न्याय मिळवण्याचा पूर्ण अधिकार आहे. कोणत्याही कंपनीने सेवेत त्रुटी ठेवल्यास त्यांना कायद्यानुसार भरपाई द्यावीच लागते, हे या निकालावरून स्पष्ट होते.''

# बालविकास प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता परदेशी यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा

**जालना - प्रतिनिधी**

श्रीमती प्रभवतीबाई कोळेश्वर बालविकास प्राथमिक शाळेत गुरुवार दि. ३० सप्टेंबर रोजी मुख्याध्यापिका सुजाता परदेशी यांचा सेवापूर्ती सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला मंडळाच्या अध्यक्षा विद्याताई कुलकर्णी होत्या. व्यासपीठावर उपाध्यक्षा शुभांगीताई देशपांडे, सचिव सुनंदाताई बदनापूरकर, सहसचिव सुषमाताई पायगव्हाणे, कोषाध्यक्षा मीराताई देशपांडे, कायदेशीर सल्लागार ॲड. सुखदाताई देशपांडे, ज्येष्ठ सदस्य विजयाताई देशपांडे, महिला मंडळाच्या पदाधिकारी सुलभाताई सिपोरकर, मनीषाताई कुलकर्णी, चित्राताई देशपांडे , श्रद्धाताई देशपांडे, आशाताई भाले, ओमप्रकाश दुर्गम, शाळेच्या माजी ज्येष्ठ सहशिक्षिका मीनाक्षीताई देशपांडे, मुख्याध्यापिका सुजाता परदेशी, त्यांचे पती दुर्गादास कौशल्ये, नूतन मुख्याध्यापिका छाया मुधोळकर यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात सौ. विद्याताई कुलकर्णी व मान्यवरांच्या हस्ते शारदादेवीच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण तथा दीप प्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ सहशिक्षिका श्रीमती आगळे यांनी केले. यानंतर सत्कारमूर्ती सुजाता परदेशी यांचा संस्था स्टाफच्यावतीने पुष्पहार व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सर्व शिक्षक, शिक्षिका व महिला मंडळ पदाधिकाऱ्यांनी मनोगतात त्यांच्या कार्यकाळाचा गौरव केला. सुजाता परदेशी यांनी सत्कारला उत्तर देताना शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त करून सर्वांच्या सहकार्याबद्दल आभार मानले. कार्यक्रमाचा समारोप सौ. विद्याताई कुलकर्णी यांच्या अध्यक्षीय भाषणाने झाला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षिका पल्लवी सरकाटे यांनी केले तर आभार सहशिक्षिका शुभांगी भुमकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या शेवटी महिला मंडळाच्या अध्यक्षांच्या हस्ते सुजाता परदेशी यांना कार्यमुक्ती प्रमाणपत्र तर ज्येष्ठ सहशिक्षिका छाया मुधोळकर यांना मुख्याध्यापकपदी नियुक्तीचे पत्र देऊन पदभार सोपवला. कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# जालना जिल्हा ग्राहक पंचायतच्या अध्यक्षपदी मोहन इंगळे यांची फेरनिवड

## संघटकपदी शिवाजी वाघ तर सचिवपदी सुनील मावकर

**जालना - प्रतिनीधी**

जालना जिल्हा ग्राहक पंचायत नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून त्यात अध्यक्षपदी मोहन इंगळे यांनी फेरनिवड करण्यात आली तर संघटकपदी शिवाजीराव वाघ यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. जालन्यात नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या जिल्हा ग्राहक पंचायतच्या जिल्हास्तरीय बैठकीत प्रथम ग्राहक तीर्थ स्व.बिंदुमाधव जोशी यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने जालना जिल्हा ग्राहक पंचायतची नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात





आली.मोहन इंगळे यांनी मागील कालावधीत विविध उपक्रम राबवत उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल मोहन इंगळे यांची अध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली. तर उर्वरित कार्यकारिणी मध्ये संघटकपदी शिवाजीराव वाघ, सहसंघटक शंकरराव संवादे, सौ.रुचिता सेवलीकर, सचिव डॉ.सुनील मावकर, सहसचिव नंदकुमार देशपांडे, कोषाध्यक्ष आर.आर.जोशी, उपाध्यक्ष दिलीप लाड, प्रसिध्दीप्रमुख अहेमद नुर, कार्यकारिणी सदस्य गणेश थोरात, सौरभ पंच यांचा नवीन कार्यकारिणीत समावेश असून नूतन पदाधिकाऱ्यांच्या या निवडीचे जिल्हा बैठकीत स्वागत करून त्यांचा छोटेखानी सत्कार करण्यात आला.

# ०५- औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक -२०२६ धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध जारी

**जालना -प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक -२०२६ साठी कार्यक्रम दि.२२ सप्टेंबर २०२६ रोजी घोषित केला आहे. सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, संस्था, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्याच्या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत. तरी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये असे आदेश जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आल्याने जालना जिल्ह्यात निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन जिल्हादंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यावर कोणत्याही राजकीय पक्षाने, व्यक्तीने, संघटनेने निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध घालणे आवश्यक आहे. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

# सेवलीत अप्पर तहसील कार्यालयासाठी आंदोलन तीव्र; बाजारपेठ बंद, रास्ता रोकोने चक्काजाम



**नेर येथील कार्यालयाचा शासन निर्णय रद्द करण्याची मागणी; 'सेवलीतच कार्यालय हवे', आंदोलकांचा निर्धार**

**जालना । प्रतिनिधी**

सेवली येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला गुरुवारी अधिक तीव्र स्वरूप प्राप्त झाले. आमरण उपोषणाचा पाचवा दिवस पूर्ण होऊन सहाव्या दिवशीही शासनाकडून ठोस निर्णय न झाल्याने संतप्त नागरिकांनी आक्रमक पवित्रा घेत सेवलीची बाजारपेठ व दुकाने बंद ठेवत शासनाचा निषेध केला. त्यानंतर करण्यात आलेल्या रास्ता रोको आंदोलनामुळे सरकारी बससह खासगी वाहतूक तब्बल दोन ते तीन तास ठप्प झाली. त्यामुळे परिसरात वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती.

सेवली येथेच अप्पर तहसील कार्यालय स्थापन करावे, या मागणीसाठी नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले. बाजारपेठ बंद, दुकाने बंद आणि त्यानंतर चक्काजाम अशा टप्प्यांत *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.